# कहाणी तुझी माझी

(निवडक प्रेम पत्रे)

प्रा. चंद्रकुमार नलगे

**अजब पब्लिकेशन्स्**
भाऊसिंगजी रोड,
कोल्हापूर- ४१६ ०१२

▶ **कहाणी तुझी माझी : प्रा. चंद्रकुमार नलगे**

▶ ©

**प्रा. चंद्रकुमार नलगे**
चंद्रबन, साहित्य निवास कॉलनी,
उजाळाईवाडी, कोल्हापूर-४
फोन नं. (०२३१) २६७७०३४

▶ **प्रकाशक**
अजब पब्लिकेशन्स्
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.
फोन : (०२३१) २५४६७१०

▶ **अक्षरजुळणी**
रावजी देसाई

▶ **मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

▶ **मुद्रक**

▶ **आवृत्ती दुसरी**
जानेवारी २००९

▶ **किंमत**
रुपये ३००/-

प्रा. बापूराव जगताप
प्रा. लुब्धा आपटे

-तुमच्यामुळेच 'कहाणी तुझी माझी'
आकाराला आली.

## ऋणनिर्देश

ॲड. श्रीपतराव शिंदे, प्रा. बापूराव जगताप, शिवाजीराव सावंत, डॉ. सुधाकर गोकाककर, प्रा. आप्पासाहेब पवार, श्री. नारायण कुपेकर, अण्णासाहेब पाटील, टी. ए. पाटील, प्रा. आनंदराव नाळे, डॉ. मुळे, प्रा. डी. एन्. पाटील, चंद्रकांत शेट्ये, चंद्रकांत मांडरे, मानसिंगराव जगताप, वि. द. कदम.

# वेडी कहाणी

अवघ्या महाराष्ट्रातील जाणत्या-नेणत्या प्रेम यात्रिकांची ही अस्सल, वास्तव सत्य प्रेमपत्रे.

गेल्या पंधरा वर्षांचा काळ कसा गेला कळलेच नाही. प्रेमिकांच्या या 'मुक्तांगणात' मीही एक धुंदी जगलो. नवे जाणवले. मदिर वातावरणातील हे क्षण स्वप्नवत्च वाटले. नित्य नवा प्रत्यय... नवे आकलन. विलक्षण झपाटून टाकणारे अवघेचि हे.

एका मित्राने आपली पत्रे विश्वासाने माझ्याकडे ठेवली. त्याच्या संमतीनेच वाचली. आवडली. त्या पत्रातील भावभावना, विचारसौंदर्य, स्वयंस्फूर्त भाषा सौंदर्य, अंत:करणाला चटका लावणारी जीवनानुभूती, असीम त्याग, समर्पण, आसक्ती भावनांचा उद्रेक, वखवखलेली नग्न वासना या साऱ्यांचे रम्य चिंतन करायला लावणारे भीषण दर्शन घडले.

वाटली, अशी असंख्याची असंख्य अज्ञात प्रेमपत्रे नव्हे प्रणय पंढरीच्या वारकऱ्यांची स्फुरणे आपण मिळविली आणि एकत्रित करून प्रकाशित केली तर...? एक विचार चमकला आणि अखंड पंधरा वर्षे तेच ध्यानीमनी भिनवून घेतले. फिरलो... बोललो. बोलून घेतलं. प्रेमाचं पिसं लागलेल्या प्रेमिकांच्याबरोबर मीच वेडापिसा झालो.

त्यांच्याबरोबर तन्मय झालो. गप्पा रंगल्या. रात्र रात्र जागलो. काळोखाचं चांदणं झालं. साऱ्यांच्या एकेक कहाण्या ऐकता ऐकता मी मलाच विसरलो. 'प्रेमिक' झालो. हसता हसताच डोळ्यातून पाणी आलं. ऐकता ऐकताच डोळ्यांचे काठ ओलावले. आसवांनी आसवांची साथ केली. मोहोरलो. गदगदलो. फुललो. व्यथित झालो. कधी प्रेमरंगाने न्हाऊन निघालो. तर कधी नखशिखांत शहारून आलो. आपण जगलेल्या भोगलेल्या प्रेमासंबंधी बोलत असताना एकेका प्रेमिकांचे अवघी कथा व्यथा व्यक्त करणारे थरथरलेले ते ओठ, ते अथांग डबडबलेले डोळे, मोगरा फुलावा

तसे डवरून, मोहोरून जाणारे अंग, त्या काळाशी एकरूप होऊन भारावून जाणे. सारे सारे आठवले की वाटते, या प्रेमकहाण्या ऐकता ऐकता 'वर्षाव पडो मरणांचा' तरी तोही भोगू.

पण ही पत्रे मिळविताना, हे सुख झेलताना खूप सोसावेही लागले. भोग भोगावे लागले. जवळचे मित्र लांब गेले. संबंध तोडू लागले. माझ्याकडे संशयी नजरा लागल्या. मी भयंकर वाटू लागलो. ओळखीचे ओळख विसरू लागले. बऱ्याचशा ओळखी दृढ झाल्या. कुणाला वाटलं मी फसवीन, पत्रे घेऊन पेचात आणीन, कोंडीत धरून हवे ते मिळवीन. कुणी काळोख्या रात्री दारात पिस्तूल घेऊन उभे राहिले. गोळी रोखून म्हणाले, 'मला माझी पत्रे हवीत.' मी घाबरलो नाही. विश्वासाने बोललो. गोळी सुटली नाही. त्याच्याकडूनच खूप पत्रे नंतर मिळविली. कुणी म्हणाले, 'हे मूर्खपणाचे लक्षण आहे.' कुणी बोलले, 'एवढ्या चांगल्या माणसाला वेड लागले. वाया गेला बिचारा.'

पण वेड तर खरेच. म्हणून तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून २७०० पत्रं मी मिळविली. ज्या पत्रांना अंधारच माहिती, अग्नीत जळून अस्तित्वशून्य बनणे. ज्यांच्या नशिबी राख होणंच लिहिलेलं त्यांना प्रकाश दिसला. एक पत्र मिळण्याची, उरण्याची मारामार अशी २७०० पत्रे उपलब्ध झाली.

सर्व थरातील, धंद्यातील, वयातील, विवाहित, अविवाहितांची पत्रे प्राप्त झाली. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, पुढारी, कामगार, भोळ्याभाबड्या मुली इत्यादींची वैविध्यपूर्ण पत्रे आहेत. या पत्रांच्या बरोबरच प्रेमिकांनी परस्परांना दिलेल्या, अजूनही त्या प्रेमाच्या स्मृतीसाठी जपून ठेवलेल्या असंख्य वस्तू दाखविल्या. दिल्या. कुणी प्रेयसीने दिलेला अंगारा सांभाळतो आहे. कपाळी माखतो आहे. कुणी भारलेले गंडे दोरे, कुणी कुणाला दिलेली चंदनी लेखणी. कुणी कुणाला अर्पण केलेले कुंकू, चिमण्या पाखरांची चोचीत चोच घातलेली चित्रे, कुणी सिनेमाचे तिकिट तर कुणी प्रेयसीच्या हातचे रेल्वे तिकिट, तर कुणी वस्त्राचा तुकडा. तर एका प्रेयसीने दिलेल्या आपल्या बांगड्या इ. वस्तू पहायला मिळाल्या. त्या दाखवत असताना त्या त्या व्यक्तींची ती ती स्मृती जागी होऊन आलेले हुंदके... त्या हुंदक्यांना विसरणेच कठीण.

२७०० अशा पत्रातील निवडक १२० पत्रे येथे घेतली आहेत. एका वयस्क प्रेयसीच्या हाती आयुष्यांच्या शेवटच्या कालात आपली पत्रे सापडतात अन्‌ ती पत्रे एकेक घेऊन भाष्य करते आहे. पूर्वीचा काल जगते आहे. अशी रचना, अशी मांडणी येथे स्वीकारली आहे. फक्त एका विद्यार्थिनीची डायरी सापडली अन्‌ तेथूनच 'कहाणी तुझी माझी' सुरू झाली. पत्रातील नाव, गाव बदलून टाकले आहे. फक्त प्रेमिकांना दिलेला शब्द पाळला.

मला ज्ञात-अज्ञात असलेल्या असंख्य प्रेमिकांनो, गेली १५ वर्षे तुमच्या भारलेल्या, भारावलेल्या, बेहोषल्या सोबतीनं अंधारयात्रा केली.

त्या 'जागल्या' रात्रींची...
'जागल्या' रात्री दिलेल्या शब्दांची
शपथ...
तुमच्या वेड्या जगातल्या कहाण्यांनी.
मला वेडं वेडं केलं
ते वेड 'उतरू' नये हीच तर आता तळमळ.

**– चंद्रकुमार नलगे**

रोजनिशी ! होय, माझीच रोजनिशी ! फार फार वर्षंपूर्वीच्या दैनंदिनीतील दोन चार पानं... साधे चिटोरेच... सापडले... आणि त्यांनी साऱ्या भूतकाळाचा अथांग सागर आणून माझ्या पायाशी रिता करायला सुरुवात केली. बाटलीत बंद करून जमिनीत गाडून टाकलेला राक्षसच पुढ्यात उभा ठाकला. माणसाचं आयुष्य शंभर वर्षाचं असतं. त्यात कितीतरी वेळा ऋतुचक्राचे फेरे गरगरून जातात; पण त्या प्रत्येक ऋतुची धुंदी, मस्ती, उन्माद सौंदर्य जाणवणारा काल मात्र ठराविकच असतो. नजरेत नवलाई उतरते, शरीराचा कण न् कण सजग होऊन उठतो. रक्ताचा थेंब न् थेंब उसळ्या घेत असतो, साऱ्या जीवनातील प्रेम, मांगल्य, सौख्य यांचे आकंठ पान करून माणूस तृप्त होतो. याच ठराविक कालात... नंतर उरतो केवळ व्यवहार... केवळ संवय... ज्यांनी आज मला गुलाम केलंय...

...आज मला दैनंदिनीची दोन पाने न मिळता जणू माझं यौवनच मला परत मिळालंय. सारी दुनिया अनोखी भासणारी संभ्रमावस्था ल्यालेलं... यौवनाच्या उंबरठ्यावरचे माप थरथरत्या पावलाने लोटू पाहणारे काव्य... अंतरंगात अनामिक हुरहुर दाटून सारं शरीर पिसासारखं हलकं फुलकं झालेलं... पराभव, अपयश ठाऊक नसलेलं. सतत आकाशीच्या चंद्र चांदण्यांशी हितगूज करण्यात रंगणारं... शाळेतील अकरा वर्षांच्या... बाल्यावस्थेचा वनवास संपून महाविद्यालयीन जीवनात सम्राज्ञीच्या तोऱ्यात मिरवणारे यौवन ! आणि... आणि... पाय घसरून साऱ्या जीवनाचाच तोल ढासळण्याची कठोर सजा फर्मावणारंही यौवनच !

मी कॉलेजच्या प्रांगणात पाऊल टाकलं आणि चारी दिशांनी सुवर्णाची आभा झळाळून उठली. जणू दिवसाला रात्र नव्हतीच. जीवनात दुःख, निराशा नव्हतीच; होता फक्त प्रकाश, फक्त यश, फक्त चैतन्य, फक्त प्रेम... फक्त प्रेमच...

## ९ जुलैची संध्याकाळ

मी, उषा कुलकर्णी, विद्या जोशी, नेहमीप्रमाणे गांधीनगरकडे फिरावयास जात होतो. मी गेले आठ दिवस उषीची सारखी चेष्टा करीत होते. म्हणून आज तिने आपल्या सरांना सांगावयाचे ठरविले होते. मी मनात म्हटले, जा जा. सांग जा तुझ्या सराला, त्यांना थोडीच घाबरतेय मी? आली आहे मोठी शहाणी सरांची भीती घालायला? तुला एक त्यांची भीती. मी का भ्यावे त्यांना? आले आहेत असले शेकडो सर. वाटलं काय हिला? जा.

पण आज घडलं ते विपरीत. आज... वगैरे सर्व मंडळी फिरावयास गेली होती व ही सर्वजण आम्हास परत येताना भेटली. सरांनी आज उषाशी न बोलता सरळ मलाच प्रश्न केला 'अहो शिंदे, तुम्ही इंग्लीश घेऊन पास झालात ना?'

'होऽ'

'मग कॉलेजला का नाही येत? कॉलेज सुरू होऊन खूप दिवस झाले. येणार आहात ना? मी ऐकलं की तुम्ही येणार आहात ! मग?'

'येणार आहे पण...'

'भीती वाटते?' मनातच उच्चारले, 'हो.'

'मग' पण का? आणि 'पण' इतक्यात का? शिक्षणानंतर.

'पण' अवश्य ठेवा. उद्या प्रिन्सिपॉलसाहेबांचा Address आहे. मग या ना उद्या !

'येईन हं.'

झालं. जे मी मनात योजलं होतं, तेच बुमरँगसारखं उलट माझ्यावरच उलटलं. इतके दिवस मी उषाला चिडवत होते. पण आज उषा आणि विद्यानं मला खूप चिडवून खाल्लं.

'आज बघ तुझ्याशीच बोलले ते !'

'अगं, साधं विचारणं आणि एका विशिष्ट हेतूनं बोलणं यात खूप फरक आहे म्हटलं बाईसाहेब, माहीत आहे?'

'ते काही का असेना, आज जिंकलं बाई !'



'एऽऽ द्वाड, जिभेला हाड आहे का?'

'तुझ्या आहे का? जरा बोलायला लागल्यानंतर पाघळली लगेच.'

'ए हलकट, मी अगदी मोजकचं बोलले हं. उगाच काहीतरी काढू नकोस.'

'का? का? आता का गं? दुसऱ्याला चिडवताना गंमत वाटते का? ए बघ, बघ विद्या आज गाल वगैरे कसे लाल झालेत. अगं, छाती किती जोरात धडधडते आहे बघ; अय्या ! –'

'ए उषे, इथे रस्त्यावर जत्रा करीन हं मी तुझी, गप्प; दुसरा विषय काढ एखादा.'

'होय गं बाई, सारखं तुम्ही त्यांचंच बोलू लागलात की, मला कसंतरीच होतं, होय ना?'

'उषे, मीच सांगते आता सरांना थांब तू.'

सरांची भीती न बाळगणारी मी आता सरांचाच आधार घेत होते. कशी सापडले गं बाई चक्रात?

छट् !

मुळीच नाही जा–

## आज रविवार १० जुलै...

आज उषाबरोबर कॉलेजवर गेले. तेथील रम्य वातावरणात मिसळल्यावर उरातील भीती थोडीशी कमी झाली. Pre-Degree Arts च्या वर्गात बसा म्हणून कोणत्यातरी सरांनी सांगितले. आम्ही जाऊन बसलो.

नंतर सारे सर व पालक मंडळी, प्रिन्सिपॉलसाहेब वगैरे सर्वजण आले. सर्वांची भाषणे झाली, व नंतर हे बोलावयास उठले–

'सौंदर्याच्या ठिकाणी देवाचा वास असतो. सुदैवाने बुद्धी–सौंदर्य याचा मिलाफ झालेली सुंदर, हौशी, व्यक्ती आपणास मार्गदर्शन करावयास लाभत आहे, हे पाहून खूप आनंद वाटतो.'

असंच काहीसे ते बोलत होते. उषी लक्ष देऊन ऐकत होती.

एकदा हळूच चिमटा काढून पाहिला. पण ती इतकी एकाग्र झाली होती की, तिला कशाचेच भान नव्हते. माझा हा चुळबूळ करण्याचा चाळा सरांच्या लक्षात आला आणि त्यामुळे मी गप्प बसले-

रमतगमत घरी अडीच वाजता आले. आल्यानंतर मस्तपैकी डब्बलकप कॉफी व पोहे घेतले.

एकंदरीत मजेत दिवस गेला. पण जाता जाता सांज-सावल्या एक हुरहुर पेरून गेल्या...

## बुधवार जुलै...

अनेकविध घटनांनी माणसाचं जीवन घडत असतं... काही घटना सुखद् सुखद् असतात, तर तशाच काही दु:खद्ही असतात.

माणसाच्या अतीव आनंदाला हुरहुर लावण्यास दु:खाचे झुळझुळते वारे हवेत, असं म्हणतात; असेल कदाचित तसे !

पण काही का असेना, जीवन हे सुखदु:खाच्या अनुभवांनी भरलेला प्याला आहे एवढं खास.

'सेवादलातर्फे' 'पुढारी पाहिजे' हे नाटक बसविले होते. मी 'सेवादलात' जाते हे घरी समजल्यावर घरी कडकडून विरोध झाला. आमचे घर संघाचे आहे. मग त्या झालेल्या विरोधांचे वर्णन नकोच ! तरीसुद्धा चोरून मी जातच होते. ओढ आवरता येत नव्हती. आम्हा मुला-मुलींचे एक महाराष्ट्र गीत बसविले होते. त्यात मुले सात आठ व मुली सात आठ होत्या. गीत तर फारच उत्कृष्ट बसले होते. नाटकही छानच बसले होते.

पुढे तो प्रयोग यशस्वीरित्या पार पडला. पुढे दोन-तीन दिवस तेच तेच सारं कानात घुमत होते. पाचवे दिवशी मी व विद्या त्यांच्या खोलीवर गेलो. त्यांनीही नाटकाच्या यशस्वीतेबद्दल आम्हाला सांगितले. त्यानंतर दुसरे दिवशी मी व आशा त्यांच्या खोलीवर गेलो. आशा घरी पुस्तक विसरून आली होती. ते आणावयास गेली. तेवढ्यात सरांनी मला एक स्वप्न सांगितले. स्वप्न ऐकल्यावर तर मी इतकी थक्क झाले की, मला काहीच सुचेना. असलं कसलं भलतंच



स्वप्न यांना पडलं ! नेमकं आमच्याच घरचं कसं स्वप्न पडलं? हे रचवून सांगतात का? छेऽ चेहऱ्याकडेसुद्धा पाहणे झाले नाही मला. मला खूप लाज वाटली.

## सोळा ऑगष्ट...

...का कोण जाणे, पण आज सकाळपासून मन बेचैन होतं. कदाचित काल संध्याकाळी फिरावयास गेल्यानंतर जे बोलणं झालं त्याचा परिणाम असेल हा !

...पण काही का असेना, सकाळपासून कसंतरी होत होतं. दोन दिवसांपूर्वीच 'दिव्यात तेल नसता' ही कविता मिळाली होती. ती वाचल्यापासून एक अनामिक हुरहुर वाटत होती. काहीतरी हरवल्यासारखं, काहीतरी सलल्यासारखं, काहीतरी धडधडल्यासारखं होत होतं. किती किती प्रयत्न केला. पण छेऽ उत्तरच मिळेना. सारखा विचार करीत होते.

मैत्रिणी तरी इतक्या चावट असतात की, उडत्या म्हातारीची पाठ धरून संशयातून सत्य शोधून काढतात. उषा, सरस्वती या तरी सारख्या छेडतच होत्या. मला मात्र गोंधळल्यासारखं होई, घाबरावयास होई. मला सारेच नवीन. सारंच धुंद ! सारंच गोड... सारंच अनोळखी.

सकाळी जरा अशाच मन:स्थितीत कॉलेजवर पाऊल टाकलं. पहिला तास हिंदीचा. सर अत्यंत तन्मयतेने शिकवित होते. पण काय उपयोग? लक्षच लागलं नाही तासाकडे ! असं का होत होते कोण जाणे ! ...दुसरा तास मराठीचा.

छाती सारखी धडधडत होती. एक प्रकारची गोड धुंदी वातावरणात आहे असं वाटत होतं. अशा गोंधळलेल्या मन:स्थितीतच मी तासास बसले होते. त्या दिवशी सरांनी 'तुकारामाचे अभंग' घेतले. तुकारामांनी वैष्णवांची लक्षणे सांगितली आहेत. मी वैष्णव आहे हे त्यांना माहीत होते. त्यामुळे त्यांनी ती लक्षणे अधिकच ठसवून सांगितली.

'वैष्णवजन तेच होतं की, जे जातीभेद पाळीत नाहीत, श्रीमंत-

गरीब, उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य असा भेद पाळीत नाहीत. साऱ्यावर ते प्रेम करतात. मी तर अशांनाच वैष्णव म्हणेन.'

हे वाक्य उच्चारल्यावर त्यांनी माझ्याकडे पाहिलं. मी पण त्यांच्याकडे पाहात होते. एकदम नजरेला नजर भिडल्याने बावरल्यागत झालं. वेड्यासारखी अवस्था झाली माझी. काय करावे, काही सुचेना, त्यांचा तास चांगलाच रंगला. त्यांनी बोलता बोलता बाबा आमट्यांचे चरित्र सांगितले. त्यांचे प्रेम कसे दिव्य आहे, हे तर त्यांनी अत्यंत तन्मयतेने सांगितले. ते ऐकत असताना तर माझी अवस्था खरोखरीच चमत्कारिक झाली. राहून राहून उषाची वाक्ये आठवू लागली... 'खरंच ते खऱ्या प्रेमाचे फार भुकेले आहेत. त्यांना तसं दिव्य प्रेम लाभावं असं मला फार वाटतं गंऽ ! बाहेरून ते जितके हसरे, प्रेमळ आहेत, तितकेच आतून ते दु:खी व भुकेलेले आहेत. म्हणून पूर्वीच्या दु:खद आठवणींचा विसर पाडून सुखाची हिरवळ पसरणारी प्रेम प्राप्ती त्यांना व्हावी असं मला फार वाटतं गंऽऽ !'

माझं लक्षच लागेना तासाकडे. खरंच, यांना पाहिल्यापासून मी अशी का वागू लागले, कोण जाणे ! पण काही तरी होतंय एवढं खरं. मनातील खळबळीचा बिंदूदेखील चेहऱ्यावर भासविला नाही मी तासाच्या वेळी. पण बरोबर त्यांनी ओळखलं, की ही पोरगी गडबडली, काही हरवून बसलीय...

उषीची केलेली चेष्टा आठवली. उषे, सारखं सांगतेस की, ते ब्राह्मणकन्या इच्छितात. मग विचार करून पहा ना जरा. मी जरूर मदत करेन. दागिनेसुद्धा देईन. मग सांगू मी त्यांना, की आमची उषाराणी तयार आहे म्हणून?

'कां गं रागावलीस? का आठवण आली एकदम?' पुढचं सारंच आठवलं आणि एकदम हसू आलं अन् नेमकं त्याचवेळी ते मजकडे पाहात होते. मी हसताना तेही हसले. मला वाटलं, हे का हसले? माझ्या मनातील सारं गुपित यांना कसं कळलं? पण ते जे शिकवित होते तो हाच विषय होता. 'अंतरीचे धांवे स्वभावे बाहेरी' खरंच, असं झालं का? माझे मला नंतर खूप हसू आलं. पण मैत्रिणी काय म्हणतील



म्हणून गप्प बसले. चटकन् घंटा झाली. तास संपला. दहा मिनिटांची सुट्टी. साऱ्याजणी बाहेर हिरवळीवर जाऊन बसल्या. मीही बरोबर गेले.

गप्पा ऐन रंगात आल्या. तेवढ्यात शिपायाने मला सांगितले की, सरांनी बोलावलंय. फक्त सरनी एवढं सांगितल्यावर मी ओळखलं की, कोणत्या सरांनी बोलावलेलं असावं... चटकन् स्टाफरूममध्ये गेले. सर काहीतरी लिहीत होते. मी आत आल्याचे त्यांच्या लक्षातच आले नाही. चेहऱ्यावरचं लाडकं हास्य, काळ्या कुरळ्या केसांचा गोड फुगा, मोठ्या झोकात हालवित, सारं लक्ष लिहिण्यात केंद्रीत करून, काहीतरी लिखाण चाललं होतं. खरंच विलक्षण धुंद होती ऐट ती ! एखादी चंचल तरुणी पाघळली असती. लगेच... मी तरी तशीच पाहात उभी राहिले. 'नजर लागेल ना !' मनात विचार चमकून गेला. 'भलताच स्मार्ट आहे हं !' मनाने कबुली दिली. 'काय जालीम नजर आहे गं बाई,' डोळ्यांनी इशारा दिला. 'का बोलावलंत?' असं विचारण्याचे भानच राहिलं नाही. दुसरा कोणी असता तर बोलवलं आणि बसला आपलं काम करीत, म्हणून ताडकन् काहीतरी बोलले असते. पण... पण...

...मी अशी मुग्धपणे का पाहात राहिले? काय पहात होते?...छेऽ चुकलंच...

मला खूप गोंधळल्यागत झालं.

'अगं, काल तुम्ही कविता समजावून घेण्यास येणार होतात ना?' त्यांनीच विचारलं.

'होय, पण आशा म्हणाली नको.'

'मग तू एकटी यायचीस.'

'मी एकटी कशी येऊ?'

'का? तुझ्या त्या मामा-मामीची भीती वाटते का तुला?'

'छेऽ मनात यायचे किंवा न यायचे असेल तर मी माझ्या देवालाही घाबरणार नाही?'

'पण देव माझ्या खोलीत कुठे आहे?'

'आहे. माझा देव तिथेच आहे.'

काय बोलले मी हे? दोघांनाही गोंधळल्यागत झालं; पण काय चटकन् परतवलं वाक्य त्यांनी? 'खरंच हं, तू वैष्णव नाही का? मग तुझा देव विठ्ठल !'

इतक्यात दुसरे आले. विठ्ठल असं म्हटल्यावर त्यांनी चमकून दोघांकडे पाहिलं; आम्ही दोघेही स्तब्धच राहिलो. आता मात्र खराखरा गोंधळ उडाला मनाचा; पण थांगपत्ता लागू दिला नाही.

इथेच खरा सुनिश्चय झाला मनाचा. बस्स ! प्राण गेला तरी हरकत नाही, पण प्रेम करायचं तर यांच्यावरच. दिव्य प्रेमाची वेल इथेच खरीखुरी फुलेल. यांच्याच हृदयात आपण वेल लावूया.

यासाठी खूप खूप सहन करावं लागेल. आई-वडिलांचा कायमचा रोष, आजोबांचा राग, भावंडाचा विरह, समाजाचा द्वेष, हेटाळणी, निंदा, तुच्छता सारं... सारं सहन करेन. पण यांच्यावरच प्रेम करायचं, यांनाच जीवन अर्पण करायचं. यांनाच कुंकवाचा धनी मानायचं. बस्स !

पण...?

पण त्यांना आवडेल का हे? त्यांचा विश्वास बसेल का माझ्यावर? न बसेना...

ओंजळीत घेतलेली फुलं, ताजी टवटवीत व दवबिंदूंनी नुकतीच न्हाऊन निघालेली असली म्हणजे झालं ! मनात नसताना अर्पण केलेल्या माणिकमोत्याऐवजी या साध्या फुलांची किंमत श्रेष्ठ असते. अशाच फुलांनी मी त्यांची पूजा बांधेन.

कोणत्याही फलाची अपेक्षा न करता !

आणि म्हणून म्हणेन-

मी तुझ्या माझ्यात होते
विश्व सारे विसरून जा
आज सीमा त्या जगाची
तूच ओलांडून जा !!



## सोमवार ऑगस्ट...

इथेच आणि या बांधावर !

तेव्हा आमच्या कॉलेजच्या पटांगणांत फुटबॉलच्या मॅचीस सुरू होत्या. त्या दिवशी शेवटचा दिवस होता. मी व विद्या मॅचीस पहावयास गेलो. माझ्या मनात मॅचीस पहावयाचे मुळीच नव्हते. मी निसटून जाण्यासाठी एकसारखी चुळबूळ करीत होते. पण कारण सापडेना. शेवटी विद्याला सांगितलं, की मी शशीला घेऊन येईन. तिने बरोबर ओळखलं. तिला माहीत होतं की, हिला एके ठिकाणी बसणं होत नाही. तिनेही चटकन् परवानगी दिली. मी शशीकडे गेले. सर्व गाव मॅचीस पाहावयास गेले होते व आम्ही दोघी नाशिक रोडला फिरावयास गेलो. जाताना शशीने स्वत:ची करूण कहाणी सांगितली. अनेक परीने समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण हेकेखोर माणसाला पटत नाही काही. शेवटी तिचे माझे भांडण झाले. दोघीही तसल्याच, 'आईवडिलांना प्रसंगी दोषी ठरविणारी मुलगी मला मैत्रीण म्हणून नको.' असं मी निक्षून सांगितलं. दोघीही एका बांधावर बसलो. या साऱ्याचा गोड शेवट म्हणून,

इथंच आणि 'या बांधावर अशीच श्यामल वेळ !'
सख्यारे किती रंगला खेळ !

हे गाणं मी म्हटलं. शशीलाही बरं वाटलं. ती चटकन् म्हणाली, 'तुझा प्रियकर खूप सुखी होईल तुझ्यापासून !'

'ते कसं शशी?'

'मी इतकी तुझ्यावर चिडले होते, पण ते सारं तू एक क्षणात विसरावयास लावलंस. माझ्यासारख्या मैत्रिणीवर एवढं प्रेम, तर तुझं सर्वस्व असलेल्या त्याला तू काय काय करशील?'

'छट् शशी-'

'शशी, ते सारं रामायण खूप मोठं आहे गं, कदाचित माझ्या हातून ते निसटूनही जायचं...'

'नको, नको म्हणू तसं...'